# उपोद्घात

संविधानाच्या अनुच्छेद 151 अन्वये राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवाल महाराष्ट्राच्या राज्यपाल महोदयांना सादर करण्यासाठी तयार करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवालात वित्तीय वर्ष 2024-25 मधील राज्याच्या वित्तीय कामगिरीचे मूल्यांकन करण्याचा आणि वित्तीय आकडेवारीच्या लेखापरीक्षण विश्लेषणाच्या आधारे राज्य विधिमंडळाला माहिती सादर करण्याचा हेतू आहे. या अहवालात तीन प्रकरणे आहेत.

**प्रकरण I - राज्याच्या वित्तीय स्थितीचा आढावा**

हे प्रकरण अहवालाचा पाया आणि दृष्टीकोन यांचे वर्णन करते आणि राज्याच्या वित्तीय स्थितीचा व्यापक दृष्टीकोन सादर करते. यामध्ये प्रमुख निर्देशांक आणि राज्याची वित्तीय स्थिती, ज्यात तूट/ अधिशेष, कर्ज रूपरेषा आणि मुख्य लोक लेखा व्यवहार यांच्या सूक्ष्मवित्तीय विश्लेषणाचा समावेश आहे.

**प्रकरण II - अर्थसंकल्पीय व्यवस्थापन**

हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेख्यावर आधारित आहे आणि राज्य शासनाच्या विनियोग आणि वितरण प्राधान्यक्रमांचा आढावा घेऊन अर्थसंकल्पीय व्यवस्थापनाशी संबंधित घटनात्मक तरतुदींमधील विचलनाचा अहवाल देते.

**प्रकरण III - वित्तीय प्रतिवेदन पद्धती**

या प्रकरणात राज्य शासनाच्या विविध प्राधिकाऱ्यांनी सादर केलेल्या लेख्यांचा दर्जा आणि राज्य शासनाच्या विविध विभागांनी विहित वित्तीय नियम व विनियमांचे अनुपालन न केल्याच्या मुद्द्यांवर भाष्य केले आहे.

विविध विभागांमधील व्यवहारांचे लेखापरीक्षण आणि कामगिरीचे लेखापरीक्षण आणि वैधानिक महामंडळे, मंडळे आणि शासकीय कंपन्यांच्या लेखापरीक्षणावेळी निदर्शनास आलेली अभिक्षणे आणि महसुली जमांवरील अभिक्षणे असलेला अहवाल स्वतंत्रपणे सादर केला जातो.

## राज्य वित्तव्यवस्था लेखापरीक्षण अहवालाचा पाया/आधार आणि दृष्टीकोन

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151 (2) नुसार, एखाद्या राज्याच्या लेख्यांशी संबंधित भारताच्या नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांचा अहवाल राज्याच्या राज्यपालांना सादर करणे आवश्यक आहे, जो त्यांनी राज्याच्या विधिमंडळासमोर ठेवणे आवश्यक आहे.

प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोषागार, कार्यालये आणि विभागांनी सादर केलेली प्राथमिक आणि सहाय्यक देयके, चलने तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त झालेल्या निवेदनाच्या आधारे राज्याचे वार्षिक वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे/तयार करतात. या लेख्यांचे प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र यांच्याद्वारे स्वतंत्रपणे लेखापरीक्षण केले जाते आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांद्वारे त्या लेख्यांना प्रमाणित केले जाते.

राज्याचे वित्तीय लेखे आणि विनियोजन लेखे हे या अहवालाची मुख्य माहिती आहे. इतर स्त्रोतांमध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहे:

- राज्याचा अर्थसंकल्प: वित्तीय मापदंड आणि प्रक्षेपणाच्या तुलनेत वितरणाचे प्राधान्यक्रम आणि अंदाजांचे मूल्यांकन करण्यासाठी, तसेच त्याच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करण्यासाठी आणि संबंधित नियम आणि विहित कार्यपद्धतींचे पालन करणे.
- प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I, महाराष्ट्र, मुंबई आणि महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र, नागपूर यांच्या कार्यालयांनी केलेल्या लेखापरीक्षणाचे निष्कर्ष.
- विभागीय अधिकारी आणि कोषागारे (लेखा तसेच व्यवस्थापन माहिती प्रणाली) यांच्याकडील इतर विदा.
- स्थूल राज्य उत्पन्न विदा आणि राज्याशी संबंधित इतर सांख्यिकी,
- महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005.
- वित्त आयोगाच्या शिफारशी.
- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे विविध लेखापरीक्षण अहवाल.
- भारत सरकारने नमूद केलेल्या सर्वोत्तम पद्धती आणि मार्गदर्शक तत्त्वे.

22 ऑगस्ट 2025 रोजी राज्याच्या वित्त विभागासोबत प्रवेश बैठक आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये लेखापरीक्षण दृष्टीकोन स्पष्ट करण्यात आला. हा मसुदा अहवाल राज्य शासनाकडे अभिप्रायासाठी पाठविण्यात आला होता. अहवालातील निष्कर्षांवर चर्चा करण्यासाठी 11 फेब्रुवारी 2026 रोजी निर्गमन बैठक आयोजित करण्यात आली होती. शासनाकडून मिळालेली उत्तरे या अहवालात योग्य ठिकाणी समाविष्ट केली आहेत.

## शासकीय लेख्यांची रचना :

**राज्य शासनाचे लेखे तीन भागांत तयार करण्यात येतात.**

### 1. राज्याचा एकत्रित निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266 (1)}

या निधीमध्ये राज्य शासनाला मिळणारा सर्व महसूल, राज्य शासनाने घेतलेली सर्व कर्जे (बाजार कर्जे, रोखे, केंद्र सरकारकडून घेतलेली कर्जे, वित्तीय संस्थांकडून घेतलेली कर्जे, राष्ट्रीय अल्पबचत निधीला देण्यात आलेले विशेष रोखे इ.), भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले अर्थोपाय अग्रिमे आणि राज्य शासनाला कर्जाच्या परतफेडीसाठी प्राप्त झालेल्या सर्व रकमा यांचा समावेश होतो. अधिनियमानुसार आणि भारतीय संविधानात दिलेल्या उद्देशांसाठी आणि पद्धतीने नसल्यास या निधीतून कोणत्याही रकमेचा विनियोग करता येणार नाही. खर्चाच्या काही श्रेणी (उदा. घटनात्मक अधिकाऱ्यांचे वेतन, कर्जाची परतफेड इ.) या राज्याच्या एकत्रित निधीवर भारित असतात (भारीत खर्च) आणि विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात. इतर सर्व खर्च (दत्तमत खर्च) विधिमंडळाद्वारे मतदानाने केले जातात.

### 2. राज्याचा आकस्मिक निधी {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 267 (2)}

हा निधी अग्रधन स्वरूपाचा असतो, जो राज्य विधिमंडळाने कायद्याने स्थापन केलेला आणि राज्य विधिमंडळाकडून अशा खर्चास मान्यता मिळेपर्यंत अनपेक्षित खर्च भागविण्यासाठी अग्रिम देता यावा यासाठी राज्यपालांच्या ताब्यात ठेवला जातो. झालेला खर्च हा राज्याच्या एकत्रित निधीच्या संबंधित कार्यात्मक मुख्यशीर्षामधून वजा करून हा निधी परतफेड केला जातो.

### 3. राज्याचे लोक लेखे {भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266 (2)}

उपरोक्त दिलेल्या व्यतिरिक्त, जेथे शासन बँकर किंवा विश्वस्त म्हणून कार्य करते तेथे शासनाला किंवा त्यांच्यावतीने प्राप्त होणाऱ्या इतर सर्व सार्वजनिक रकमा या लोक लेख्यांमध्ये जमा केल्या जातात. अल्पबचत आणि भविष्य निर्वाह निधी, ठेवी

(व्याजासहित आणि व्याजविरहित), अग्रिमे, राखीव निधी (व्याजसहित आणि व्याजविरहित), वित्तप्रेषण आणि निलंबन शीर्ष (अंतिम नोंद प्रलंबित असेपर्यंत हे दोन्ही तात्पुरते शीर्ष आहेत) यांसारख्या परतफेडीचा लोक लेख्यात समावेश आहे. शासनाकडे उपलब्ध निव्वळ रोख शिल्लक देखील लोक लेख्यात समाविष्ट केली जाते. लोक लेखे विधिमंडळाच्या मतदानाच्या अधीन नसतात.

